संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)

जनसंपर्क विभाग

## शेती समृद्धीसाठी जलव्यवस्थापन महत्वाचे - डॉ. टाले
## डॉ. पंजाबराब उपाख्य भाऊसाहेब देशमुख जयंती कार्यक्रम व व्याख्यानाचे आयोजन

अमरावती.

शेती समृद्धीसाठी जलव्यवस्थापन महत्वाचे आहे. पाण्याचे व्यवस्थापन व नियोजन वर्तमानात न झाल्यास भविष्यात मोठ्या संकटाचा आपल्याला सामना करावा लागेल, म्हणून सर्वांनी जलसाक्षर होवून जलव्यवस्थापन व नियोजन या कार्यात सहभागी व्हावे याशिवाय शेतकऱ्यांनी किफायतशीर शेती करण्याकडे कल द्यावा, असे प्रतिपादन डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथील कृषीपद्धती व पर्यावरण केंद्राचे माजी संचालक डॉ. सुभाष टाले यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात डॉ. पंजाबराव देशमुख प्रादेशिक अर्थव्यवस्था नियमन केंद्र व पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग यांचे संयुक्त विद्यमाने डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचा जयंती कार्यक्रम व 'किफायतशीर शेती व जलव्यवस्थापन' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन विद्यापीठ दृकश्राव्य सभागृहात करण्यात आले, त्याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.

व्यासपीठावर अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीचे माजी सचिव डॉ. अशोक राऊत, पदव्युत्तर अर्थशास्त्र विभागाचे समन्वयक डॉ. रविंद्र सरोदे, डॉ. पंजाबराव देशमुख प्रादेशिक अर्थव्यवस्था नियमन केंद्राचे समन्वयक डॉ. सुरेश जगताप उपस्थित होते.

डॉ. सुभाष टाले विषयाची मांडणी करतांना म्हणाले, भाऊसाहेबांनी केलेल्या त्यागामुळे आपण सर्वजण समृद्ध जीवन जगतो आहोत. सर्व पिढ्यांचं मूळ शेती असून वर्तमानकाळात शेती व्यवसायाकडे दुर्लक्ष होत आहे. शेतीवर जे कुटुंब पूर्णपणे अवलंबून होते, ते मागे पडलेत. खूप कबाडकष्ट करुन शेतीत शेतकरी राबल्या गेला. इतर देशांच्या तुलनेत भारतीय शेतकऱ्यांकडे अधिक कौशल्य आहे, तरी तो मागे कसा कां राहीला, हा प्रश्न महत्वाचा आहे.

शेती टिकविण्यासाठी शेतकरी टिकवावा लागेल. अन्नधान्य शेतीतून पिकते, मुख्य स्त्रोत तोच आहे, त्यामुळे हा स्त्रोत जीवंत राहण्याची गरज आहे. शेतीची पोत, उत्पादकता वाढविण्यासाठी डोळस कष्टाची गरज आहे. अमरावती जिल्ह्या खारपाण पट्टा आहे. पावसाळा, हिवाळा, उन्हाळा अशा ऋतुची देणं आम्हाला लाभली आहे. निसर्गाने आम्हाला भरपूर दिल आहे. वैचारिक दारिद्र्याचा व नियोजनाचा अभाव जलव्यवस्थापनाच्या बाबतीत दिसून येतो.

८२ टक्के पाणी शेती, उद्योग १० टक्के, घरघुती ८ टक्के पाणी भारतात वापरल्या जाते. केवळ शेतीवर अवलंबून न राहता वेगवेगळे उद्योगधंदे, जोडधंदे याची सांगड घातल्या गेली पाहिजे. अन्नधान्याची स्वस्ताई ही अन्नधान्यासाठी घातक आहे. बदलत्या हवामानामध्ये शेती विकाऊ कशी राहील, यावर झालेल्या संशोधन लाभ शेतकऱ्याने घेतला पाहिजे. पर्यावरण संरक्षणासाठी झाडांची संख्या वाढविण्याची गरज आहे. तलाव, धरणे, सरोवर, गावतलाव, नद्यांमध्ये पिण्यायोग्य पाणी आहे, याचे संरक्षण करण्याची गरज आहे. जलसाक्षरता प्रत्येकांमध्ये निर्माण होण्याची गरज आहे, असेही ते म्हणाले.

डॉ. अशोक राऊत म्हणाले, कृषी विद्यापीठांनी लोकापर्यंत पोहोचले पाहिजे. भारतात अमुलाग्र बदल घडवून आणण्यासाठी विद्यार्थ्यांनी विचारमंथन, चिंतन करावे, असा उपदेशही त्यांनी यावेळी केला. डॉ. रविंद्र सरोदे यांनी मनोगतातून भाऊसाहेबांमुळे शिक्षणाची गंगा खेड्यापाड्यात पोहचू शकली. शिक्षण, सामाजिक, कृषी, उद्योग क्षेत्रात त्यांनी महान कार्य केले, त्यांच्या कार्यापासून सर्वांनी प्रेरणा घ्यावी, असे सांगितले.

अध्यक्षीय भाषणात कुलसचिव डॉ. तुषार देशमुख म्हणाले, भाऊसाहेबांनी सामाजिक व्यवस्थेचा जवळून अभ्यास केला. ३१ व्या वर्षी त्यांनी शिक्षण संस्था उभारली. त्या माध्यमातून समाज शिक्षित केला, रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन दिल्यात. युवकांनी शेती व्यवसायाकडे वळण्याची गरज असून त्यासाठी समाजव्यवस्था बदलण्याची गरज आहे. पाणी व्यवस्थापन महत्वाचे असून कृषी विद्यापीठांनी केलेले संशोधन शेतकऱ्यापर्यंत पोहोचण्याची गरज आहे. शेतीतील उत्पादकता आजही कमी आहे. जलपूर्नभरणा व्यवस्था प्रत्येकाने आपल्या घरामध्ये करावी, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.

विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कर्मयोगी संत गाडगे बाबा व डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. डॉ.पं.दे.प्रा.अ. नियमन केंद्राचे समन्वयक डॉ. सुरेश जगताप यांनी प्रास्ताविकतेतून व्याख्यान आयोजनामागील भूमिका मांडली व पाहुण्यांचा परिचय करुन दिला. पाहुण्यांचे स्वागत गौरवग्रंथ देवून डॉ. रविंद्र सरोदे व डॉ. सुरेश जगताप यांनी केले. संचालन डॉ. भगवान फळके यांनी, तर आभार डॉ. ज्योती ढोमणे यांनी मानले. जयंती कार्यक्रम व व्याख्यानाला वित्त व लेखा अधिकारी डॉ. भारत कऱ्हाड, एल.एल.ई.चे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, महानुभाव अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. महंत सोनपेठकर, विभागप्रमुख डॉ. गजानन गुल्हाने, डॉ.के.बी. नायक, डॉ. किशोर राऊत, उपकुलसचिव श्री मंगेश वरखेडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २७/१२/२०१९.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी